## <u>रे. दि. मु. नं.११४/२००४ मधील निशाणी क्र.१६७ वरील आदेश</u>

(सिंधू रामदास खंडाईत वगैरे विाा राजेंद्र गणपती डफळे वगैरे)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.६ ने त्याच्याविरुध्द 'उलटतपास नाही'चा झालेला आदेश रद्द होवून उलटतपास घेण्यास संधी मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र.६ चे अर्जातील कथनांनुसार, प्रतिवादीची आई मयत झालेने प्रतिवादी हा विजापूर येथे गेलेने वादीचा उलटतपास घेता आला नाही. त्यामुळे त्यांच्या विरुध्द 'उलटतपास नाही' चा आदेश दि.०५.०३.२०२२ रोजी झाला आहे. प्रतिवादी यांना उलटतपास घेणेस नाकारलेस प्रतिवादी यांचे पैशाने न भरुन येणारे नुकसान होणार असून प्रतिवादी यांना न्यायापासून वंचित राहावे लागणार आहे. तरी न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादी यांच्याविरुध्द झालेला 'उलटतपास नाही'चा आदेश रद्द होवून प्रतिवादी यांना वादीचा उलटतपास घेण्याची संधी मिळावी, अशी विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

०३. सदर अर्जावर वादी यांनी आपले म्हणणे देवून हरकत नोंदविली आहे. प्रस्तुतचा दावा हा १७ वर्षपैक्षाही जुना आहे. सदर प्रतिवादी यांनी सदर अर्जात जे कारण नमुद कले आहे, ते कारण देवून सदर दाव्याचे नेमले तारखेस तसा अर्जदेखील मे.कोर्टात दिलेला नव्हता. तसेच, सदर प्रतिवादी हे जाणूनबुजून सदरचे काम प्रोलॉग करत आहेत. तरीही यापुर्वीही सदरकामी उलटतपास नाहीचा आदेश झालेला असलेने आता पुन्हा सेट असाईड करुन मागता येणार नाही. सबब अर्ज नामंजूर करावा असे कथन केले आहे.

०४. प्रस्तुतचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी क्र.६ चे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा दावा हा जुना आहे. प्रस्तुतचा अर्ज हा गुणदोषावर चालविण्याकरीता प्रतिवादी क्र.६ ला उलटतपास घेण्यास संधी देणे न्यायोचित होईल. प्रस्तुतचा अर्ज नामंजुर केलेस प्रतिवादी क्र.६ यांना अपरिमित नुकसान होईल, असे दिसून येते. तसेच प्रस्तुतच्या अर्जाचे काम प्रतिवादी क्र.६ च्या वर्तुणुकीमुळे लांबणीवर पडलेचे दिसून येते. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह मंजुर करणे योग्य होईल. सबब, पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादी क्र.६ चा अर्ज रक्कम रुपये १०००/– (रक्कम रुपये एक हजार) खर्च वादी यांना देणेचे अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.६ चे विरुध्द झालेला दि.२१.११.२०२२ रोजीचा 'उलटतपास नाही'चा आदेश रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र.६ ने पुढील नेमले तारखेस न चुकता साक्षीदाराचा उलटतपास घ्यावा.

Digitally signed by Chetna Yashwant Neware
Date: 2022.12.19 15:31:40 +0530

पाटण, जिल्हा सातारा. (सी.वाय.नेवारे)
दिनांकः १२.१२.२०२२ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
पाटण.